दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप |
उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड महाराष्ट्र | बुधवार | २ जुलै 2025 |
| अंक क्र. 58 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# अन्यायाला आता न्यायाची किनार लाभणार

## २४ तासांत निर्णय: बीड लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या तपासासाठी महिला आयपीएसच्या नेतृत्वाखाली SIT नेमणार – मुख्यमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

**मुंबई | प्रतिनिधी**

बीड शहरात अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या गंभीर प्रकरणाचा तपास आता एका वरिष्ठ महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक (SIT) करणार असल्याची घोषणा आज मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली.

ही SIT नेमण्याची मागणी माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांनी काल केली होती. विशेष म्हणजे ही मागणी २४ तासांत राज्य सरकारने मान्य केली, ही बाब राज्यात चर्चेचा विषय बनली आहे.

**"दोषींना कुणीही वाचवू शकणार नाही" – फडणवीस**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. अशा प्रकारात आणखी काही मुलींचे लैंगिक शोषण झाले असण्याची



शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पीडित मुलींनी पुढे येऊन तक्रार दिल्यास त्यांना सर्वतोपरी संरक्षण व न्याय दिला जाईल. या प्रकरणातील आरोपी, त्यांना मदत करणारे, आश्रय देणारे किंवा राजकीय आडोसा देणारे कुणीही असो कोणालाही सोडणार नाही.

### धनंजय मुंडे, चेतन तुपेंचा आक्रमक पाठपुरावा

धनंजय मुंडे यांनी काल विधिमंडळात हा मुद्दा मोठ्या ठामपणे उपस्थित केला होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार चेतन तुपे यांनीही आज यावर आवाज उठवला. त्यामुळे राज्य सरकारवर तातडीने कृती करण्याचा दबाव वाढला होता.
धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानत सांगितले की, या प्रकरणातील पीडितेला न्याय मिळेपर्यंत मी हे प्रकरण लावून धरणार आहे. ही केवळ एका मुलीची नव्हे, तर समाजाच्या सुरक्षिततेची बाब आहे."

### SIT ला कालमर्यादा निश्चित

या विशेष तपास पथकाला ठराविक कालमर्यादा दिली जाणार असून, त्या मुदतीतच तपास पूर्ण करून निष्कर्ष सादर करणे बंधनकारक राहणार आहे. तपास प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, निष्पक्ष आणि कठोर कारवाईसाठी कार्यरत राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.
या निर्णयामुळे बीड शहरातील वातावरण ढवळून निघाले असून, नागरिकांत काहीसा विश्वास निर्माण झाला आहे.

# ४.६ लाखांचा मुद्देमाल जप्त



**अंबाजोगाई (प्रतिनिधी) –**

अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या गुटखा वाहतूक करणाऱ्या एका इसमावर पोलिसांनी कारवाई करत सुमारे ४ लाख ६८ हजार २२० रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. ही कारवाई दिनांक 01 जुलै 2025 रोजी पहाटेच्या सुमारास गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आली.

पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे यांच्या नेतृत्वाखालील पथक पेट्रोलिंग करत असताना त्यांना माहिती मिळाली की, अजय उर्फ ऋषिकेश शिंदे (रा. होळ) हा इसम आपल्या चारचाकी वाहनातून विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला वाहतूक करत आहे.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ छापा टाकत संशयिताच्या वाहनाची तपासणी केली. त्यावेळी वाहनातून विविध कंपन्यांचा गुटखा व पानमसाला असा एकूण किंमत ४,६८,२२० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. वाहनासह एकूण जप्त मालमत्तेची किंमत अंदाजे ४०,९६,८२० रुपये इतकी आहे.

अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत , स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह. रामचंद्र केकान, पो.ना. गोविंद भताने व पो.शि. सचिन आंधळे यांनी केली.

# सिद्धी विनायक मानव कल्याण मिशनची गुरुपौर्णिमा नियोजन बैठक यशस्वीरित्या संपन्न

## १० जुलै रोजी लक्ष्मी लॉन्स येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन




**नाशिक | प्रतिनिधी**

सिद्धी विनायक मानव कल्याण मिशनच्या वतीने होणाऱ्या गुरुपौर्णिमा उत्सवाच्या नियोजनासाठी बैठक प.पू. डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली.

बैठकीला नियोजन समितीचे अध्यक्ष आणि क्रां. व्ही. एन. नाईक शिक्षण संस्थेचे विश्वस्त श्री नारायणराव काकड, ज्येष्ठ उद्योगपती श्री बुधाजीदादा पानसरे, चिंतामनराव सोनवणे, लक्ष्मी लॉन्सचे प्रोप्रा. प्रविणभाऊ काकड, माजी संचालक श्री विलासराव आव्हाड, शिवसेना नेते श्री भाऊसाहेब निकम, श्री शांताराम सांगळे, श्री गणपतराव हाडपे, श्री बाळासाहेब घुगे, श्री रंगनाथ दरगुडे, श्री श्याम पिंपरकर, श्री संजीव अहिरे, श्री बी. के. नागरे सर, सुधीर दराडे, श्रीमती प्रियंका कानडे, श्री रामदास सानप, श्री अभिमान हाडपे, श्री संदीप सानप, श्री रमेश सानप, श्री शांताराम जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.उत्सवाचे आयोजन १० जुलै रोजी लक्ष्मी लॉन्स, बीड येथे बैठकीत ठरवण्यात आले की, गुरुपौर्णिमा उत्सव १० जुलै रोजी लक्ष्मी लॉन्स येथे भव्य स्वरूपात साजरा करण्यात येईल. कार्यक्रमाची सुरुवात गुरुवंदन भरतनाट्यम नृत्य सादरीकरणाने होणार आहे. त्यानंतर गुरुपूजन, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे.विशेष म्हणजे कार्यक्रमात प्रमुख अतिथींचा वृक्ष भेट देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

या कार्यक्रमात १०वी, १२वी, पदवी व पदविका तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येईल. गुणवंत विद्यार्थ्यांची नावे खालील संयोजकांकडे लवकरात लवकर पाठवावीत: श्री श्याम पिंपरकर – 9850822923, श्री संजीव अहिरे – 9130749980, श्री बी. के. नागरे – 98507961. श्री गणपतराव हाडपे यांनी सर्व कार्यकर्त्यांचे आणि उपस्थितांचे तन-मन-धनाने योगदान दिल्याबद्दल आभार मानले. गुरुपौर्णिमा नियोजन समितीने सर्व नागरिकांना संपूर्ण उत्सवात सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवण्याचे आवाहन केले आहे.

# सुरुडीतील शाळेतून ग्रामीण परिवर्तनाची नवसंधी !

## भरत गीते यांच्या हस्ते 'जपानी भाषा केंद्रा'चे भव्य उद्घाटन

### जागतिक दर्जाचं शिक्षण मिळणं हे आपल्या पुढच्या पिढीसाठी सुवर्णसंधी- भरत गीते

**आष्टी ( संतोष सानप )**

जग जिंकण्यासाठी आता भाषेची तयारी ग्रामीण विद्यार्थ्यांनाही गावातूनच करता येणार आहे. स्वामी विवेकानंद विद्यालय, सुरुडी येथे "Foreign Language Learning Centre" अंतर्गत जपानी भाषा शिक्षण केंद्राचे भव्य उद्घाटन शनिवारी उत्साहात पार पडले. या उपक्रमामागे इंजा फाउंडेशनचा पुढाकार असून कॉस्मो कंपनीचा मोलाचा सहभाग लाभला आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया म्हणून ओळखले जाणारे, तसेच तौरल इंडिया कंपनीचे CEO श्री. भरत गीते यांच्या हस्ते संपन्न झाले. गीते म्हणाले,

मीही परकीय भाषा शिकूनच आयुष्यात यश मिळवलं. भाषेने मला भारतात अनेक उद्योग आणता आले. आज बीडसारख्या जिल्ह्यात जागतिक दर्जाचं शिक्षण मिळणं हे आपल्या पुढच्या पिढीसाठी सुवर्णसंधी आहे.



### भाषेच्या माध्यमातून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल

कार्यक्रमास कॉस्मो जपानचे DGM श्री. हयोद्यो रयोता, कॉस्मो इंडियाचे डायरेक्टर श्री. रामकुमार बस्नेत, आणि 'द बाप कंपनी'चे CEO श्री. रावसाहेब घुगे यांचीही उपस्थिती लाभली. "गावातच परकीय भाषा शिकण्याची संधी म्हणजे शिक्षण क्रांतीचा आरंभ आहे," असा विश्वास या मान्यवरांनी व्यक्त केला.

### ग्रामीण परिवर्तनाची नवसंधी !


ग्रामीण भागात शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीय शक्यता निर्माण करणारा हा उपक्रम म्हणजे एक "ग्रामीण परिवर्तनाची नवसंधी" आहे.या उदघाटनाने बीड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्राला नवसंजीवनी मिळाली असून, भविष्यात सुरुडी हे नाव "ग्लोबल लँग्वेज हब" म्हणून ओळखलं जाईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### सचिन सारूक यांचा ध्यास... आणि गावाचा अभिमान !

या उपक्रमामागे उभं राहिलेल्या सचिन सारूक व त्यांच्या सहकाऱ्यांच्या कार्याला उपस्थितांनी भरभरून दाद दिली.
ग्रामस्थ आणि शाळा व्यवस्थापन समितीने श्री. भरत गीते यांचे खास आभार मानत ही घटना सुरुडी गावाच्या शैक्षणिक इतिहासातील 'सुवर्णपान' असल्याचे नमूद केले.

# माणुसकी सेवा फाऊंडेशनच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी प्रकाश वेदपाठक यांची नियुक्ती

## सामाजिक बांधिलकी, प्रशासनात सुसंवाद आणि शेवटच्या घटकांसाठी संघर्षरत नेतृत्व



**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) संलग्न माणुसकी सेवा फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी प्रकाश वेदपाठक यांची नियुक्ती नुकतीच करण्यात आली. सामाजिक कार्यात सक्रिय आणि ग्रामीण भागातील जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची ही योग्य निवड असल्याचे सर्वत्र मानले जात आहे. वेदपाठक यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष, प्रवक्ते व माणुसकी सेवा फाऊंडेशनचे महाराष्ट्र अध्यक्ष महेश भाऊ शिंदे यांच्या हस्ते अधिकृत नियुक्तीपत्राद्वारे प्रकाश वेदपाठक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महेशभाऊ शिंदे हे सध्या संपूर्ण महाराष्ट्रभर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांचे विचार व धोरणे तळागाळात पोहोचविण्यासाठी महाराष्ट्रासह संपूर्ण मराठवाड्यात झंजावाती संवाद दौरे करीत आहेत. सामाजिक माध्यमातून प्रशासन, शासकीय योजना आणि विकासाचे मॉडेल ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचविणे, जनतेच्या अडचणी प्रशासनापर्यंत नेऊन त्या मार्गी लावणे, आणि सामान्य नागरिकाचे जीवनमान उंचाविण्यासाठी ते अहोरात्र झटत आहेत. माणुसकी सेवा फाऊंडेशन हे समाजासाठी समर्पित कार्य करणारे आहे. या दूरदृष्टीमुळेच माणुसकी सेवा फाऊंडेशनने प्रत्येक जिल्हा, तालुका व ग्रामीण पातळीवर शाखा स्थापनेचे अभियान हाती घेतले आहे. सामाजिक जाणीवा असलेले कार्यकर्ते, युवक व महिलांचा सक्रिय सहभाग यातून घडतो आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र केवळ सामाजिक मदतीपुरते न राहता शासकीय योजनांचे प्रबोधन, आरोग्य शिबिरे, शिक्षणवाढ, शेतकऱ्यांसाठी कृषी मार्गदर्शन, महिला व बालकल्याण, व्यसनमुक्ती, रोजगार निर्मिती यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर आधारित आहे. आपल्या निवडीबद्दल आमच्या प्रतिनिधीशी बोलताना प्रकाश वेदपाठक यांनी सांगितले की, 'माझी ही नियुक्ती म्हणजे पदापेक्षा जबाबदारी ही मोठी आहे. समाजातील शेवटच्या माणसापर्यंत शासनाच्या विविध योजना आणि न्याय पोहोचविणे हेच माझे ध्येय आहे. सन्माननीय महेश भाऊंनी माझ्यावर दाखविलेला विश्वास मी प्रत्यक्ष कामातून सिद्ध करीन,' असे आश्वासन प्रकाश वेदपाठक यांनी आपल्या निवडीनंतर उपस्थितांशी संवाद साधताना व्यक्त केले. वेदपाठक यांच्या निवडीचे बीड जिल्ह्यातून उत्स्फूर्त स्वागत करण्यात येत आहे. या निवडीनंतर अंकुश गंगावणे (बीड जिल्हाध्यक्ष), संजय तेलंग, सय्यद अमजद, प्रवीण सोळंके, शेख नासेर, रवी उबाळे, महेश वेदपाठक आदींसह अनेक पदाधिकाऱ्यांनी प्रकाश वेदपाठक यांना शुभेच्छा देवून त्यांचे अभिनंदन केले.

# शिक्षण : प्रश्न अनेक - उत्तर एक श्री ज्ञानोबा वरवट्टे गौरव ग्रंथ प्रकाशन कार्यक्रम व सेवापुर्ती गौरव सोहळा उत्साहात संपन्न

## २०२९ मध्ये मराठवाडा शिक्षक संघाचा प्रतिनिधी सभागृहात दिसला पाहिजे-आमदार सुधाकर आडबाले

## ज्ञानोबा वरवट्टे गौरव ग्रंथ हा शिक्षणाबद्दल चिंतन व चिंता निर्माण करणारा ग्रंथ - साहित्यिक प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर

**जालना / प्रतिनिधी**

सभागृहात संघटनेचाच प्रतिनिधी निवडून पाठवला तर तो शिक्षण व शिक्षकांचे प्रश्न निर्भयपणे मांडू शकतो व त्यास न्याय मिळवून देऊ शकतो त्यासाठी २०२९ मध्ये होणाऱ्या निवडणुकीत मराठवाडा शिक्षक संघाचाच प्रतिनिधी सभागृहात दिसला पाहिजे यासाठी आत्तापासूनच प्रयत्न करा असे अवाहन शिक्षक आमदार सुधाकर आडबाले यांनी केले तर शिक्षण : प्रश्न अनेक - उत्तर एक श्री ज्ञानोबा वरवट्टे गौरव ग्रंथ म्हणजे सध्याच्या शिक्षण व्यवस्थे बाबत चिंतन व चिंता निर्माण करायला लावणारा ग्रंथ आसल्याचे प्रतिपादन जेष्ट साहित्यिक प्रा.प्रल्हाद लुलेकर यांनी केले.

जालना येथील मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय उपाध्यक्ष श्री.ज्ञानोबा वरवट्टे यांची सेवापुर्ती व शिक्षण:प्रश्न अनेक-उत्तर एक श्री. ज्ञानोबा वरवट्टे गौरव ग्रंथ प्रकाशन सोहळ्यात शिक्षकांना मार्गदर्शन करताना आडबाले बोलत होते. राजकीय पक्षाच्या प्रतिनिधी ऐवजी शिक्षकांचाच प्रतिनिधी सभागृहात निवडून पाठवला तर तो शिक्षण व शिक्षक विरोधी धोरणाला ठाम व निर्भिडपणे विरोध करू शकतो. त्यासाठी मराठवाड्यात शिक्षण व शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी अहोरात्र लढत आसलेल्या मराठवाडा शिक्षक संघाचा उमेदवारच २०२९ निवडणुकीत विजयी होवून सभागृहात दिसला पाहिजे यासाठी आत्तापासूनच प्रयत्न करा असे अवाहन त्यांनी केले.

तर सध्याची शिक्षण व्यवस्था भ्रष्टाचाराने आतून ती खूप पोखरून गेली आसून त्यामुळे सर्व सामान्यांच्या मुलांना शिक्षण घेणे भविष्यात खूप आवघड होवुन बसणार आहे. सध्याचे शासन गोरगरीबांच्या मुलाबाळांना शिक्षणापासून वंचित ठेवणारी शिक्षण व्यवस्था राबवत आसून त्याविरुद्ध आपण सर्वांनी त्वेषाने उठून लढले पाहिजे. त्यासाठी हा गौरव ग्रंथ हे काम करेल त्यासाठी आपण सर्वांनी हा शिक्षण:प्रश्न अनेक उत्तर एक श्री.ज्ञानोबा वरवट्टे हा गौरव ग्रंथ वाचला पाहिजे असे प्रतिपादन केले.

मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी समारंभात बोलण्याची सुरवात करताना फुले-शाहू-आंबेडकर या महामानवांनी गोरगरीब श्रमिक कष्टकरी वर्गास शिक्षणाची दारे उघडली. त्यांची प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात कर्मवीर भाऊराव पाटील, डॉक्टर पंजाबराव देशमुख, कर्मवीर मामासाहेब जगदाळे, समाजसुधारक बलभीमराव कदम आदी शिक्षण महर्षी जन्मले व त्यांनी राज्यातील वाड्यावस्त्यांवर शिक्षण पोहंचवले. मात्र विद्यमान राज्यकर्त्यांनी शिक्षणाचे खाजगीकरण करण्याचा सपाटा लावला असून त्यामुळे श्रमिक कष्टकरी वर्ग शिक्षण प्रक्रियेतून बेदखल होणार असून या प्रश्नाचे उत्तर आंदोलन आणि प्रबोधन असल्याचे प्रतिपादन केले.



जालना येथील मुक्तेश्वर लॉन्स सांस्कृतिक सभागृहात रविवार दि.२९ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याला विचारपीठावर शिक्षक आमदार सुधाकर आडबाले, जेष्ट साहित्यिक प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर यांच्यासह मराठवाडा शिक्षक संघाचे विद्यमान अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, जालना जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, सत्कारमूर्ती ज्ञानोबा वरवट्टे,सिनेट सदस्य उमाकांत राठोड, प्रा.डॉ.मारोती तेगमपुरे, प्रा. डॉ. पुरुषोत्तम जन्ने आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी सुर्यकांत विश्वासराव व राजकुमार कदम यांनी सुध्दा मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन संघटनेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रेमदास राठोड यांनी केले तर आभार जिल्हा सचिव संजय येळवंते यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मराठवाडा शिक्षक संघाचे आरेफ कुरेशी, फरखुंद अली सय्यद, भीमा शंकर शिंदे, जगन वाघमोडे, गणेश चव्हाण, प्रद्युम्न काकड, रमेश गाढे, गणेश मेहेत्रे, सुधाकर डोईफोडे, जनार्दन कुदर, संजय चव्हाण, हकीम पटेल यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमास मराठवाड्यातील संघटनेचे सर्व आजी-माजी पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बोगस शिक्षक भरती घोटाळ्या बाबत स्वतंत्र SIT नेमून चौकशी करा

बोगस शिक्षक भरती घोटाळ्याबाबत बोलताना शिक्षक आमदार आडबाले म्हणाले की,बोगस शिक्षक भरती घोटाळा हा नागपूर विभागा पुरता मर्यादित नसून त्याची व्याप्ती संपूर्ण राज्यभर आहे त्यासाठी त्याची सखोल चौकशी करण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील सेवानिवृत्त अधिकारी अथवा सेवानिवृत्त न्यायाधीश यांची SIT समिती नेमून घोटाळ्याची सखोल चौकशी करावी व दोषींना कडक शासन करावे असी मागणी सभागृहात करणार असल्याचे सांगितले. तसे निवेदन हि राज्याचे मुख्यमंत्री व शिक्षण मंत्री यांना देणार आसल्याचे सांगितले.

# भटवाडी येथील फुटपाथवरील अनधिकृत बांधकामाचा बेस्ट बसला अडथळा,मनपा विभागाने फुटपाथवरील अनधिकृत बांधकाम हटवण्याची स्थानिकांची मागणी

**घाटकोपर,(सुभाष कोकणे)**



घाटकोपर पश्चिम भटवाडी येथे मुंबई महानगर पालिकेने भाजी विक्रेत्यांसाठी मंडई बांधून दिलेली असलेली तरी देखील हे भाजी विक्रेते तसेच अन्य वस्तू विक्रेते हे रस्त्यावर फुटपाथ वर येऊन आपला बाकडा लावून भाजी व इतर साहित्य घेऊन विक्री करण्यास बसत आहेत.त्यामुळे घाटकोपर स्टेशन वरून येणाऱ्या तसेच कांदिवली,वरळी येथे जाणाऱ्या मोठ्या बेस्ट बसेस यांना वळणावर वळण घेण्यास बेस्ट चालकास मोठी कसरत करावी लागते.परिणामी याठिकाणी अपघात होण्याची देखील शक्यता नाकारता येत नाही,त्यासाठी राम जोशी मार्ग रस्ता हा रुंद करण्याची आवश्यकता आहे अशी स्थानिकांची मागणी आहे.तसेच यासाठी वाहतूक शाखेने देखील यामध्ये महत्त्वाची भूमिका घेऊन लवकरात लवकर कारवाई करावी.रस्ता लहान निमुळता असल्यामुळे बेस्ट बस ला याठिकाणी वळण घेता येत नाही,कारण पुढे फुटपाथवर आलेले अनधिकृत बांधकाम हे महत्त्वाचे कारण ठरत आहे.परिणामी (ता.३० जून) रोजी सकाळी बाबू गेनू मंडई येथील राम जोशी मार्गावर बेस्ट बस नंबर MH01 - CR - 3061 ही बेस्ट बस वळण घेत असताना बंद पडली.सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही.महानगर पालिकेने हे फुटपाथ वरील अनधिकृत बांधकाम खाली करून रस्ता मोकळा करून द्यावा अशी मागणी स्थानिक रहिवाशी यांनी लोकप्रतिनिधी व महानगर पालिका अधिकारी यांच्याकडे करत आहेत.

# इनरव्हील क्लब परळीच्या अध्यक्षपदी अ‍ॅड . शुभांगी गीते

## सेक्रेटरीपदी शैलजा बाहेती तर उपाध्यक्षपदी उमाताई समशेट्टी

**परळी वैजनाथ...**

इनरव्हील क्लब परळीच्या अध्यक्षपदी येथील नामांकित वकील अ‍ॅड. शुभांगी गीते यांची निवड करण्यात आली आहे. सेक्रेटरीपदी शैलजा बाहेती तर उपाध्यक्षपदी उमाताई समशेट्टी यांची निवड करण्यात आली असून नूतन पदाधिकारी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे. इनरव्हील क्लब च्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे नूतन अध्यक्षा अ‍ॅड. शुभांगी गीते यांनी सांगितले.





इनरव्हील क्लब ही सामाजिक संस्था गेल्या 26 वर्षां पासून परळी वै. येथे कार्यरत आहे. इनरव्हील क्लब जागतिक स्तरावरची संस्था आहे. इनरव्हील क्लब तर्फे अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. अनेक शाळांमध्ये किंवा कुठल्याही सामाजिक कार्यामध्ये इनरव्हील क्लब गेले अनेक षे परळीमध्ये काम करत आहे. या क्लबला अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत जगप्रसिद्ध अशी संस्था आहे.

इनरव्हील क्लबच्या सदस्यांची नुकतीच एक बैठक होऊन त्यात नवीन वर्षासाठी कार्यकारिणी निवडण्यात आली. यात अध्यक्षपदी अ‍ॅड. शुभांगी गीते यांची दुसऱ्यांदा निवड झालेली आहे. शुभांगी गीते यांनी क्लब चे सर्व पदे भूषवलेली आहेत. याच बैठकीत उर्वरीत कार्यकारिणी निवडण्यात आली ती पुढीलप्रमाणे उपाध्यक्षपदी उमाताई समशेट्टी, कोषाध्यक्षपदी उर्मिला कांकरिया, आय. एस. ओ. तारावती बंसल यांची तर एडिटरपदी शोभना सौंदळे यांची नियुक्ती झालेली आहे. मागील वर्षीच्या अध्यक्ष श्रद्धा हालगे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांची निवड केलेली आहे. नूतन पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

दरम्यान इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा अ‍ॅड. शुभांगी गीते यांनी आगामी वर्षांत विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. संस्थेच्या ध्येयधोरनाणे सामाजिक कार्य केले जाणार असल्याचे सांगितले.


# आरोग्यसेवा म्हणजे फक्त व्यवसाय नव्हे, ती एक सेवा आहे!




प्रत्येक वर्षीप्रमाणे याही वर्षी परळी ब्लड डायरीच्या वतीने यावर्षीही डॉक्टर्स डे च्या निमित्ताने परळीतील ज्येष्ठ आणि सेवाभावी डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. या वेळी डॉ. गुट्टे सर, डॉ. सानप सर आणि डॉ. बाळासाहेब सर यांचा सत्कार करून त्यांच्या वैद्यकीय सेवेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.सत्कार प्रसंगी परळी ब्लड डायरीचे सदस्य उमेर सय्यद सय्यद अब्बास, अहमद भाई, शेख युनुस, हसन भाई आणि एजाज भाई उपस्थित होते.

# पुरी येथील अथवा अन्य धार्मिक स्थळी चेंगराचेंगरीचे गालबोट चिंताजनक !

ओडिशातील पुरी येथील भगवान जगन्नाथ रथयात्रेच्या वेळेस रविवार दिनांक २९ जून २०२५ ला सकाळी पहाटे ४ वाजून ३० मिनिटांनी भावीक श्रीगुंडीचा मंदिराच्या सामोरं भगवान जगन्नाथ यांचे दर्शन करण्यासाठी भक्तगण मोठ्या संख्येने जमा झाले होते याच वेळेस अचानक धक्का-मुक्की झाली अशा परिस्थितीत लोकांना काहीच समजेनासे झाले व चेंगराचेंगरी झाली यात ६ भाविकांचा मृत्यू झाला तर ५० पेक्षा अधिक लोक गंभीररीत्या जखमी झालेत.भगवान जगन्नाथ रथयात्रेच्या दरम्यान लाखोच्या संख्येने भाविक येतात त्यामुळे अशा दुर्घटनांवर स्थानिक प्रशासन,राज्य सरकार व केंद्र सरकारने करडी नजर ठेवने गरजेचे आहे.अशाच प्रकारे मे महिन्यात गोव्यातील लैराईदेवी यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी गोवा,महाराष्ट्र आणि कर्नाटक येथुन दरवर्षी ७० ते ८० हजार भाविक याठिकाणी पोहचत असतात.परंतु दिनांक ३ मे २०२५ शनिवारला गोव्याच्या उत्तर भागात असलेले शिरगांव येथील श्री लैराईदेवी मंदिरात पहाटे ३ ते ४ च्या दरम्यान भाविकांमध्ये अचानक चेंगराचेंगरीची घटना घडली यात ६ लोकांचा मृत्यू झाला होता व ८० पेक्षा अधिक गंभीर जखमी झाले होते.वार्षिक उत्साहासाठी हजारो भाविक अरूंद गल्ल्यांमधुन मंदिरात येत असतांना ही भयावह घटना घडली.मंदिरातील उत्सवासाठी किमान ३० ते ४० हजार भाविक एकत्र जमले होते.यातील काही जण उतार असल्याने खाली पडले.त्यामुळे इतरही लोक एकमेकांच्या अंगावर कोसळल्याने भयावह चेंगराचेंगरीचा घटना झाली.दरवर्षी कुठे ना कुठे चेंगराचेंगरीच्या घटनांचा प्रकार दिसून येतो. यामुळे जीवितहानी सुध्दा होते.त्याची पुनरावृत्ती आपल्याला पुरीच्या रथयात्रे दरम्यान श्री गुंडीचा मंदिराजवळ दिसून आली.अशाच प्रकारची घटना आंध्रप्रदेशातील प्रसिद्ध तिरूपती बालाजी मंदिराजवळ वैकुंठ व्दार दर्शनाच्या टोकन वितरण केंद्रावर झालेल्या चेंगराचेंगरीत दिनांक ८ जानेवारी २०२५ ला ६ जणांचा मृत्यू झाला होता व ४० हुन अधिक गंभीर जखमी झाले होते.टोकन वितरण केंद्र सकाळी ५ वाजता उघडण्याचे नियोजन होते.यासाठी भाविक रांगा लावू लागले व प्रचंड गर्दी झाली होती.विविध केंद्रावर सुमारे ४००० हजारहून अधिक भाविक रांगेत उभे होते व चेंगराचेंगरीमुळे मोठा गोंधळ उडाला आणि त्यात एका महिलेचा प्रथम मृत्यू झाला व नंतर गंभीर जखमी झालेल्या ५ भाविकांचा मृत्यू झाला अशाप्रकारे ६ भाविकांना चेंगराचेंगरीत आपले प्राण गमवावे लागले. देशात दरवर्षी अनेक ठिकाणी मंदिर परिसर, प्रवचन परिसर, किर्तन परिसर, गर्दीचे ठिकाण,रेल्वे स्टेशन किंवा अन्य ठिकाणी चेंगराचेंगरीचे प्रकार होतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी सुध्दा झालेली आहे आणि याचे जिवंत उदाहरण आपल्याला ओडिशातील पुरी येथील भगवान जगन्नाथ रथयात्रेच्या दरम्यान श्री गुंडीचा मंदिर परिसरात दिसून आले. चेंगराचेंगरीचे प्रकार का होतात याला मुख्य जबाबदार कोण याचाही विचार आपण सर्वसामान्यांनी, मंदिर प्रशासनाने व स्थानिक प्रशासनाने केला पाहिजे.कारण भाविकांनी भीड करायची व मंदिर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करायचे त्याचे प्रयचित्य भाविकांनी भोगायचे अशी परिस्थिती आज चेंगराचेंगरीच्या प्रकारात दिसून येते म्हणजेच "आ बैल मुझे मुझे मार" अशी परिस्थिती झालेली आहे. भारतातील चेंगराचेंगरीच्या अनेक भयावह घटना झालेल्या आहेत यामध्ये ५ मार्च २०१० ला उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला होता.भारतात बऱ्याच ठिकाणी अपुऱ्या आणि पायाभूत सुविधांच्या मर्यादांमुळे असुरक्षितता असते. अनेकदा दुर्गम ग्रामीण भागात, डोंगराळ प्रदेशात, टेकड्यांवर किंवा योग्य मार्ग नसलेल्या नदीकाठावर धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन केले जाते. अशा ठिकाणी असलेला तीव्र उतार, स्थळाची असमान भूरचना,अरुंद मार्ग, एकाच ठिकाणी भाविक एकत्रित येणे या कारणांमुळे धार्मिक कार्यक्रमामध्ये मोठे धोके निर्माण होतात. त्यातून चेंगराचेंगरीच्या घटना घडतात.धार्मिक किंवा सामूहिक कार्यक्रम घेताना व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करते व दुर्घटना उद्भवतात. इंटरनॅशनल जर्नल ऑफ डिझास्टर रिस्क रिडक्शननं (आयजेडीआरआर)ने प्रकाशित केलेल्या २०१३ च्या अभ्यासात असं दिसून आलं की, भारतातील ७९ टक्के चेंगराचेंगरीचे ठिकाणे हे धार्मिक मेळावे आणि तीर्थयात्रेची ठिकाणे आहेत. विकसित देशांमध्ये बहुतेक चेंगराचेंगरी स्टेडियम, संगीत मैफिली आणि नाईट क्लबच्या ठिकाणी होतात. परंतु भारत आणि इतर विकसनशील देशांमध्ये चेंगराचेंगरीच्या बहुतेक दुर्घटना धार्मिक स्थळांवर होतात,असे केरळ सरकारच्या भू आणि आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे सहाय्यक प्राध्यापक फैसल टी. इलियास यांनी सांगितले. ४ जुलै २०२४ उत्तर प्रदेशातील हाथरस येथे एका धार्मिक कार्यक्रमात चेंगराचेंगरी होऊन किमान २७ जणांचा मृत्यू झाला,१७ फेब्रुवारी २०२४ उत्तर प्रदेशातील मथुरा येथील पूजनीय श्रीजी मंदिरात होळीपूर्वी झालेल्या कार्यक्रमादरम्यान चेंगराचेंगरीत किमान सहा भाविक बेशुद्ध पडले तर काही जण जखमी झाले,२४ डिसेंबर २०२३ मथुरा येथील बांके बिहारी मंदिरात गर्दीमुळे गुदमरून दोन महिला भाविकांचा मृत्यू झाला,१ जानेवारी २०२२ जम्मू आणि काश्मीरमधील प्रसिद्ध माता वैष्णोदेवी मंदिरात भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे झालेल्या चेंगराचेंगरीत १२ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले,२१ एप्रिल २०१९ तामिळनाडूच्या त्रिची येथील मंदिर उत्सवात चेंगराचेंगरीत सात जणांचा मृत्यू झाला,१० ऑगस्ट २०१५ झारखंडमधील देवघर शहरातील एका मंदिरात चेंगराचेंगरीत किमान ११ जणांचा मृत्यू आणि ५० जण जखमी झाले,१४ सप्टेंबर २०१४ आंध्र प्रदेशातील राजमुंद्री येथे 'पुष्करम' उत्सवाच्या उद्घाटनाच्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी जमली होती गोदावरी नदीच्या काठावरील एका प्रमुख स्नानस्थळावर चेंगराचेंगरीत २७ यात्रेकरूंचा मृत्यू आणि २० जण जखमी झाले,२५ ऑगस्ट २०२४ ला मध्यप्रदेशातील सतना जिल्ह्यातील एका मंदिरात अफवेमुळे चेंगराचेंगरी झाल्यानं दहा यात्रेकरू ठार आणि २० हून अधिक जखमी झाले,१३ऑक्टोबर २०१३ मध्यप्रदेशातील दातिया येथील रतनगढ मंदिराजवळ चेंगराचेंगरीत ८९ जणांचा मृत्यू आणि १०० हून अधिक जखमी झाले,१४जानेवारी २०११ केरळमधील सबरीमाला मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत १०६ यात्रेकरू ठार तर १०० हून अधिक जखमी झाले,४ मार्च २०१० उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला, ३०सप्टेंबर २००८ राजस्थानमधील जोधपूरमधील मेहरानगड किल्ल्याच्या परिसरात असलेल्या चामुंडा देवी मंदिरात चेंगराचेंगरीत २४४ लोकांचा गुदमरून मृत्यू झाला,३ ऑगस्ट २००६ हिमाचल प्रदेशातील नैना देवी मंदिरात चेंगराचेंगरीत सुमारे १५० भाविकांचा मृत्यू आणि ४०० हून अधिक जखमी झाले,२६ जानेवारी २००५ ला पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील वाई जवळील मंदेर देवी मंदिरात वायरिंगमध्ये शॉर्ट सर्किटमुळे ठिणग्या निघाल्यानं घाबरलेल्या हजारो भाविकांनी गर्दी केली होती. मंदिराकडे जाणाऱ्या अरुंद मार्गावर गर्दी झाल्याने चेंगराचेंगरी झाली व लोक एकमेकांवर पडल्याने २९१ जणांचा मृत्यू झाला तर २०० हून अधिक जण जखमी झाले,२७ ऑगस्ट २००३ नाशिक कुंभातील पवित्र स्नानादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ३९ जणांचा मृत्यू झाला तर १४०जण जखमी झाले.चेंगराचेगरीच्या भयावह घटना पहाता त्या टाळण्यासाठी मंदिर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सर्वसामान्यांनी किंवा भाविकांनी गर्दीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याठिकाणी आपण जावे की नाही याचा गंभीरतेने विचार करूनच गेले पाहिजे. मंदिर परिसरातील वाढत्या चेंगराचेंगरीच्या घटना पहाता मंदिर प्रशासनावर राज्य सरकारने व केंद्र सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे व त्यांच्या चुका उघड करून कारवाई करून त्यात सुधारणा करण्याची आज गरज आहे. देशातील संपूर्ण मंदिरे हे भारतीय संस्कृतीचे आस्थेचे प्रतिक आहे आणि मंदिर प्रशासन व सरकार यांच्यात तालमेल व्यवस्थित असला तर चेंगराचेंगरीच्या भयावह घटना सहज टाळता येतात. अशाप्रकारे वरील भयावह घटना टाळण्यासाठी भाविक,मंदिर प्रशासन, स्थानिक प्रशासन,राज्य सरकार व केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष केंद्रित केले पाहिजे व अशा घटनांच्या बाबतीत सतर्कता बाळगली पाहिजे.कारण या दुर्घटना आपण सहज टाळु शकतो. याकरीता सर्वांनीच"जान है तो जहान है" हा मुलमंत्र अंगीकारला हवा आणि अशा गंभीर दुर्घटनांवर अंकुश लावला पाहिजे.



**– लेखक : रमेश कृष्णराव लांजेवार, (स्वतंत्र पत्रकार)**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# संपादकीय

## गोंधळी नको; विरोधक अभ्यासू हवेत...

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या सुरुवातीला विधान भवनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मोठा गदारोळ पाहायला मिळाला. काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार नाना पटोले यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर त्यांचे दिवसभरासाठी निलंबन करण्यात आले; परंतु विरोधी पक्षाच्या एका सदस्यांवर कारवाई केली म्हणून विरोधकांनी संपूर्ण दिवसभरातील कामकाजावर बहिष्कार टाकला. त्यामुळे गेले दोन दिवस जनतेच्या प्रश्नांवर विधानसभेत आवाज उठवला गेला असे चित्र दिसले नाही.

शेतकऱ्यांबद्दल कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी काही दिवसांपूर्वी वादग्रस्त वक्तव्य केले होते.

या दोन्ही नेत्यांवर कारवाई करण्याची मागणी करत काँग्रेस माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. या दोघांवर कारवाई करण्याची मागणी करताना पटोले यांनी थेट विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आसनाकडे धाव घेतली आणि हातवारे करत आक्रमकपणे बोलण्याचा प्रयत्न केला. नाना पटोलेंच्या या भूमिकेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही आक्रमक झाल्याचे दिसले. अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणे चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी पटोले यांना फटकारले. यावेळी सभागृहात जोरदार गदारोळ झाला. या सगळ्या राड्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी पटोले यांच्यावर एका दिवसासाठी कारवाई करण्याची घोषणा केली. यानंतर विरोधकांनी अधिक आक्रमक होत घोषणाबाजी केली. या सरकारचे करायचे काय? 'खाली डोकं वर पाय...' माफी मागा... माफी मागा शेतकऱ्यांची माफी मागा... अशी घोषणाबाजी करत सभागृहात गोंधळ घातला. त्यानंतर सर्व विरोधकांनी सभात्याग केला. आता पुढे काय? उद्याही असा एखादा मुद्दा घेऊन विरोधक गोंधळ घालू लागले तर, मूळ कामकाज कसे होणार, याकडे आता लक्ष देण्याची गरज आहे. पावसाळी अधिवेशन पंधरा दिवसांचे असते. या काळात पुन्हा सभागृहात गोंधळ झाला, तर जनतेचे प्रश्न मांडणार कधी असा प्रश्न अनुत्तरित राहणार आहे.

लालफितीत अडकडलेल्या प्रशासकीय कामकाजाला गती देण्याचे काम विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या माध्यमातून होते. जनतेतून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना सन्मान असला तरी, ज्या जनतेतून तो निवडून येतो, त्याचे प्रश्न, समस्या सरकारच्या माध्यमातून लवकर मार्गी लागाव्यात यासाठी वर्षातून तीन वेळा विधिमंडळाचे अधिवेशन होत असते. नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी असल्याने, एक अधिवेशन त्या ठिकाणी होते. अन्य दोन अधिवेशनेही राजधानी मुंबईत होतात. अधिवेशन सुरू होण्याआधी तारांकित प्रश्नांच्या माध्यमातून ४५ दिवस आधी जे प्रश्न विचारले जातात, त्याची उत्तरे संबंधित मंत्र्यांला लेखी स्वरूपात द्यावी लागतात. लक्षवेधी प्रश्न, हरकतीचा मुद्दा, औचित्यांचा मुद्दा, विशेष चर्चा आदींबाबत आमदारांना असलेल्या अधिकारांतून जास्तीत जास्त जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवला जाईल, अशी अपेक्षा असते. सर्वसाधारणपणे सभागृहात एखाद्या लोकप्रतिनिधीने मत मांडले ते खरे आहे असे मानून मंत्र्यांकडून त्यावर उत्तर दिले जाते; परंतु अलीकडच्या काळातील अधिवेशनातील कामकाज पाहता, जनतेच्या प्रश्नांवर सभागृहात चर्चा घडवून आणण्यापेक्षा किंवा या चर्चेत सहभागी होण्यापेक्षा विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन करण्यात आमदारांना अधिक रस असल्याचे दिसून येते. पायऱ्यांवर केलेल्या आंदोलनाला इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून प्रसिद्धी मिळत असल्याने, आपला चेहरा त्यात दिसावा अशी धडपड त्यात अनेकांची पाहायला मिळते; परंतु विधिमंडळाच्या आवारात केलेले आंदोलन हे रेकार्डवर नसते. ते दिवसभरातील एक प्रकारे मनोरंजन होते.

विधानसभेचे २८८ आमदार आहेत. ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदाराला आपल्या मतदारसंघातील प्रश्न मांडण्याची संधी विधानसभेत मिळायला हवी असते; परंतु असे गोंधळ होत राहिले तर, आमदारांना जनतेच्या समस्यांवर प्रश्न विचारण्याची संधी कशी मिळेल? याचा अन्य सदस्यांनी विचार करायला हवा. आजचे उदाहरण घेऊ या... नाना पटोले यांनी अध्यक्षांच्या दालनांपर्यंत जाऊन गोंधळ घालण्याची खरंच गरज होती का? विधिमंडळ हे कायदे मंडळ आहे. राज्याच्या जनतेच्या हिताचे निर्णय विधेयक बहुमताने पारित करून केले जातात. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष पदावर बसलेल्या व्यक्तीचा मान मोठा आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि विधानसभा अध्यक्ष यांचा दर्जा हा सारखा असतो. त्यामुळे, नाना पटोले यांच्यासारख्या विधानसभा अध्यक्षपद आधी भूषविलेल्या लोकप्रतिनिधींनी पदाचा मान राखायला हवा होता. पटोले यांनी काँग्रेस पक्षासारख्या राष्ट्रीय पक्षाची राज्याची धुराही सांभाळलेली आहे. तरीही त्यांचा संयम सुटला. पटोले यांच्यावरील कारवाईनंतर, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा जो निर्णय घेतला, त्यातून जनतेच्या प्रश्नांवर विरोधक संवेदनशील नाहीत, हे पुन्हा एकदा दिसून आले.

'नेमेचि येतो पावसाळा' याप्रमाणे विधिमंडळ सचिवालयाकडून वर्षातून तीन अधिवेशने होत राहतील. या अधिवेशनासाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करावी लागते. तो पैसा जनतेच्या करातूनच खर्च केला जातो. त्यामुळे विरोधकांनी विधिमंडळाच्या कामकाजावर भर देत, जो जनतेचा आवाज आहे, तो सभागृहात मांडण्याकडे लक्ष द्यायला हवे. महाराष्ट्र विधानसभेची आजची स्थिती अशी आहे की, विरोधी पक्षाच्या आमदारांकडे पुरेसे आमदार नसल्याने विरोधी पक्ष नेते पदावर कोणाची वर्णी लागलेली नाही. आपले संख्याबळ कमी असताना, जास्तीत जास्त सभागृहात बाजू मांडणे हे लोकशाहीच्या दृष्टीने हिताचे आहे. सभागृहात आमदारांनी मांडलेला मुद्दा हा रेकॉर्डवर घेतला जातो. त्यामुळे एखाद्या आमदारांने अभ्यासपूर्ण केलेले भाषण हा पुढील काळात संदर्भ म्हणून वापरला जाऊ शकतो, याचे भान प्रत्येक आमदारांनी ठेवायला हवे.

# विरा फाऊंडेशन च्या माध्यमातून राहुल घोबाळे यांचे कार्य कौतुकास्पद; नितीन समशेट्टे

परळी वैजनाथ

विरा फाऊंडेशन च्या माध्यमातून राहुल घोबाळे यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन भाजपा नेते नितीन समशेट्टे यांनी विरा फाऊंडेशन या सामाजिक संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित शालेय साहित्य वाटप कार्यक्रमात केले.

सामाजिक कार्याचा वसा घेऊन मागील तीन वर्षांपूर्वी राहुल घोबाळे यांनी विरा फाऊंडेशन या सामाजिक संस्थेची स्थापना केली. या संस्थेचा 4 था वर्धापन दिन मंगळवार, 1 जुलै रोजी साजरा करण्यात आला. जिल्हा परिषद शाळेत या निमित्ताने विद्यार्थाना शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी 200 विद्यार्थ्यांना वही, पेन, दप्तर सह शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना भाजपा नेते नितीन समशेट्टे यांनी राहुल घोबाळे यांच्या विविध सामाजिक कार्याची कौतुक केले. विरा फाऊंडेशन च्या माध्यमातून सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा, क्रिकेट स्पर्धा, गरजूंना विविध माध्यमातून मदत अश्या विविध सामाजिक कार्याची दखल घेण्यात येईल व हे कार्य अनेकांना प्रोत्साहित



करेल असे गौरवोद्गार यावेळी काढले.

यावेळी जेष्ठ रिपाई नेते आर एच आण्णा व्हावळे, राष्ट्रवादी काँग्रेस नेते माधव ताटे, जेष्ठ नेते राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार उत्तमदादा माने, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, कामगार नेते भाई गौतम आगळे, जेष्ठ नेते विश्वनाथ गायकवाड, भारतीय बौद्ध महासभेच्या शहरअध्यक्षा प्रजावती ताई कांबळे, भाजपाचे अश्विन मोगरकर यांनी मनोगत व्यक्त केले.

विरा फाऊंडेशन च्या शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा दासू वाघमारे सरांनी अध्यक्षीय समारोप करत विरा फाऊंडेशनच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी विरा फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष राहुल घोबाळे यांनी संस्थेच्या आत्तापर्यंत केलेल्या कार्याचा आढावा मांडला. यावेळी विरा फाऊंडेशनच्या वतीने पँथर नेते बौद्धवासी धम्मानंदजी मुंडे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने 11 ऑगस्ट रोजी पँथर चळवळीत कार्य केलेल्या जेष्ठ नेत्यांचा समाजभूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. गौरवमूर्ती म्हणून नामदेवराव रोडे गुरुजी (आदर्श शिक्षक पुरस्कार) गंगाधर अप्पा रोडे, प्रा. दासु वाघमारे सर, बाबुराव साळवे, भास्कर नाना रोडे, माधव ताटे, भाई गौतम आगळे, विश्वनाथ गायकवाड, सोपान ताटे, राजाभाऊ उमाजी रोडे, सीमाबाई कांबळे, भीमराव मुजमुले यांच्या नावाची राहुल घोबाळे यांनी घोषणा केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विरा फाऊंडेशन चे मनोहर मुंडे यांनी तर आभार प्रदर्शन सुरेश रोडे यांनी केले.

या कार्यक्रमास बाबासाहेब शिंदे महेंद्र रोडे शमी शेख खदीर भाई शरण मस्के राजेंद्र ओझा रमेश गायकवाड जितेंद्र मस्के शिवाजी देशमुख अमर सूर्यवंशी धम्मा क्षीरसागर दत्ता जाधव बाबा कांबळे अरविंद धीवार विकास जाधव योगेश मुंडे जनाब फिरोजभाई रणजीत नाना सरोदे भगवान सोपान गायकवाड भगवान सिताराम गायकवाड राहुल पैठणे अशोक पोटभरे उपस्थित होते.

# देशी बनावटीचा गावठी कट्टा जप्त



जालना | प्रतिनिधी

जालना गावठी कट्टा बाळगणाऱ्या एका तरुणाला सदर बाजार पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. हे पिस्तूल खरेदी-विक्रीत असणाऱ्या अन्य दोन जणांनाही ताब्यात घेतले आहे. अविनाश अंकुश वाघमारे, शेख शकील शेख शाहेद, जय कन्हैया भांडारकर अशी ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत. यातील जय भांडारकर हा पोलिसाचा मुलगा असल्याचे समोर आले आहे. शहरातील जिजामाता चौक परिसरात ही कारवाई करण्यात आली आहे. गावठी पिस्तूल बाळगताना अविनाश वाघमारे याला ताब्यात घेतल्यानंतर त्याने ही गावठी पिस्तूल शेख शकील शेख शाहेद याच्या मध्यस्थीने जय कन्हैया भांडारकर याच्याकडून खरेदी केल्याची कबुली दिली आहे.

# राजस्थान मधील उदयपूर येथे प्रशिक्षणासाठी सांगली जिल्ह्यातील चौघांची निवड

### विकास वायदंडे, आप्पासाहेब जाधव, मंदार नलवडे, विनोद आंबी यांचा समावेश

शिराळा / प्रतिनिधी

सी सी आर टी प्रशिक्षण उदयपूर राजस्थान येथे सांगली जिल्ह्यातून चार शिक्षकांची निवड माननीय उपसंचालक यांनी केले आहे. प्रशिक्षण कार्यशाळा संस्कृती संसाधने आणि प्रशिक्षण केंद्र भारत सरकारचे सांस्कृतिक मंत्रालय नवी दिल्ली यांच्यामार्फत दरवर्षी प्रशिक्षण आयोजित केले जाते. या प्रशिक्षणासाठी संपूर्ण भारत देशातून विविध राज्यातील शिक्षक या प्रशिक्षणासाठी उपस्थित राहतात. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांमध्ये सीसीआरटीमार्फत हे प्रशिक्षण आयोजित केले आहे. हे प्रशिक्षण उदयपूर राजस्थान या ठिकाणी संपन्न होणार आहे. हे प्रशिक्षण दिनांक १जुलै २०२५ ते १० जुलै२०२५ या कालावधीमध्ये शालेय शिक्षणातील हस्तकला कौशल्य आत्मसात करणे या









विषयासंदर्भात प्रशिक्षण होणार आहे. सी सी आर टी नवी दिल्ली यांच्यामार्फत या प्रशिक्षणासाठी सांगली जिल्ह्यातून सी सी आर टी सांगली जिल्हा मार्गदर्शक आणि वाळवा तालुका शिक्षण संघाचे अध्यक्ष सुधाकर पाटील यांच्या मार्गदर्शनातून विकास वायदंडे,आप्पासाहेब जाधव, मंदार नलवडे आणि विनोद आंबी यांची राजस्थान उदयपूर या ठिकाणी होणाऱ्या प्रशिक्षणासाठी निवड झालेली आहे.

# ब्रह्मीभूत श्री संत मोतीराम महाराज चरित्र ग्रंथ प्रकाशन सोहळा

बऱ्याच वर्षांपासून अनेक भाविक भक्तांनी श्री संत मोतीराम महाराज यांचा चरित्र ग्रंथ व्हावा ही अपेक्षा व्यक्त केली होती. खरोखर हा सुवर्ण दिवस जवळ येऊन ठेपला आहे. महाराजांचे चरित्र साकारत आहे. याचा आनंद व्यक्त करताना व सर्व भाविक भक्तांना आज ही गोड बातमी देताना खूप आनंद होतोय.श्री संत मोतीराम महाराजांचे चरित्र जगासमोर यावं यासाठी ज्यांनी धडपड केली ते सर्व संपादक मंडळ आणि माहिती गोळा करण्यासाठी मनोहर सेठ फळा, किशनराव पौळ गुळखंडकर यांनीही सहकार्य केले. या सर्वांनी अथक परिश्रम घेऊन श्री संत मोतीराम महाराजांच्या जीवनातील घटना, प्रसंगाची नोंद घेतल्यामुळेच आज हा चरित्र ग्रंथ साकारत आहे.

ब्रह्मीभूत श्री संत मोतीराम महाराज चरित्र

- संपादक : - ह.भ.प.भालेराव गुरुजी लोहेकर, ह.भ.प.आत्माराम महाराज रायवाडीकर, ह.भ.प.केशव महाराज पालमकर, ह.भ.प.विठ्ठलराव




पौळ गुरुजी फळेकर व साहित्यभूषण डॉ.घ.ना. पांचाळ

यांनी संपादित केलेल्या श्री संत मोतीराम चरित्र ग्रंथास ह.भ.प.डॉ.किशन महाराज साखरे, ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर, ह.भ.प.संदीपान महाराज हासेगावकर या तिघांचाही अभिप्राय मिळालेला आहे. ही मान्यवर मंडळीही या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित राहणार आहेत. हा चरित्र ग्रंथ प्रकाशन सोहळा आषाढी एकादशी दि. 06 जुलै 2025 रोजी श्री संत मोतीराम महाराज संस्थान श्री क्षेत्र पंढरपूर येथे ह.भ.प.अच्युत महाराज दस्तापूरकर यांच्या हस्ते होणार आहे. तरी सर्व भाविक भक्त मंडळींनी या कार्यक्रमांस उपस्थित राहावे हेच आग्रहाचे निमंत्रण.

**विनीत : विश्वस्त मंडळ श्री संत मोतीराम महाराज संस्थान फळा**

अध्यक्ष - गिरधारी काकाणी, उपाध्यक्ष - संभाजी पुरभाजी पौळ, सचिव - विठ्ठलराव पौळ गुरुजी, सदस्य बालाप्रसाद बन्सीलाल दरक,श्री रामनारायण रामलाल मुंदडा, श्री गोपाळदास नारायणदास तापडिया, श्री तुकारामजी भाऊराव पौळ, श्री मुरलीधर मदनलालजी काबरा,श्री राध्येश्याम रतनलाल भंडारी, श्री संजय विठ्ठलराव पौळ, श्री रामचंद्र मारोतराव पौळ आदी विश्वस्त मंडळी

**श्री संत मोतीराम महाराज श्री क्षेत्र पंढरपूर व आळंदी बांधकाम समिती**

अध्यक्ष - श्री राध्येशाम रतनलाल भंडारी, उपाध्यक्ष - मारोती धोंडीबाराव पौळ, सचिव - श्री सुधाकर व्यंकटराव शेवटे, कोषाध्यक्ष - श्री आनंद श्यामलाल काबरा, सदस्य - श्री दिलिपराव विठ्ठलराव दुधाटे, श्री विठ्ठलराव देविदासराव पौळ, श्री बालाजी रंगनाथराव कोटगीरे,श्री बबनराव सदाशिवराव शिंदे, श्री मंचकराव बळीरामजी पौळ, श्री बाळासाहेब विश्वनाथराव पौळ, श्री हनुमंतराव मनोहरराव पौळ,श्री बबनराव मारोतराव पौळ, श्री उत्तमराव भाऊराव पौळ, श्री सुभाष रामराव पौळ, श्री संभाजी रामकिशन ढवळे आदी सर्व बांधकाम समिती सदस्य

**व्यवस्थापक** : श्री संत मोतीराम महाराज संस्थान फळा व पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्त मंडळी.

# लोकमानस

## मुलखावेगळी माणस : सुन्दर हस्ताक्षर कलाकार पांडुरंग

"सुंदर हस्ताक्षर, चांगल्या व्यक्तिमत्त्वाचा दागिना आहे" असे म्हटले जाते, आणि हिंगोली जिल्ह्यातील गुगुळपिंपरी येथील पांडुरंग चोपडे यांचे जीवन हे याचं प्रमाणे आहे. पंधरा वर्षांपासून शालेय विद्यार्थ्यांना हस्ताक्षराची कला शिकवणारे पांडुरंग चोपडे यांचं कार्य नक्कीच प्रेरणादायक आहे. त्यांनी आतापर्यंत सहा लाख विद्यार्थ्यांना मोफत हस्ताक्षराचे धडे दिले आहेत.पांडुरंग चोपडे यांच्या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरातील वळणाचा आणि सुधारण्याचा आहे. त्यांना विश्वास आहे की, शालेय जीवनातच सुंदर हस्ताक्षर शिकल्यास विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक प्रगल्भ आणि सुंदर होऊ शकते. यासाठी त्यांनी वसमतच्या दोन इंग्रजी शाळांमध्ये सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा घेतल्या. तहसीलदार शारदा दळवी यांच्या उपस्थितीत या कार्यशाळेचा समारोप करण्यात आला.

पांडुरंग चोपडे यांचे कार्य विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी खूप महत्त्वाचे आहे, कारण




एक चांगलं हस्ताक्षर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक सकारात्मक ओळख देतं. कार्यशाळांमध्ये विद्यार्थ्यांना अक्षर सुंदर व वळणदार कसे करावे, याबद्दल मार्गदर्शन केलं जातं. यामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व आणि कार्यक्षमता सुधरते. विद्यार्थ्यांचे सुधारणारे हस्ताक्षर पाहून त्यांच्या पालकांनाही आनंद झाला आहे, आणि त्यामुळे शाळेतील वातावरण सुधारण्यास मदत होते.

लालबहादूर शास्त्री व लिटल किंग्ज शाळेमध्ये पांडुरंग चोपडे यांनी दहा दिवसांपासून स्वच्छ व सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा घेतली आहे. यात विद्यार्थ्यांच्या आधीच्या हस्ताक्षरातील चांगला बदल झाला आहे. पालक देखील आपल्या मुलांचे सुधारलेले हस्ताक्षर पाहून खुश आहेत.तहसीलदार शारदा दळवी यांनी या कार्यशाळेचे महत्त्व ओळखून, ग्रामिण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये देखील अशा कार्यशाळांचा आयोजन करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. "माझ्या तालुक्याच्या शाळांमध्ये हस्ताक्षर स्वच्छ आणि सुंदर व्हावे," असे त्या म्हणाल्या.

पांडुरंग चोपडे यांचा ध्येय एकच आहे, आणि ते म्हणजे हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुंदर आणि मोत्यासारखे बनविणे. हस्ताक्षर चांगले असणे, व्यक्तिमत्त्वासाठी महत्त्वाचे आहे. ज्याचं हस्ताक्षर चांगले असते, त्याचे व्यक्तिमत्त्व देखील चांगले असते. यामुळे त्यांचा प्रयत्न केवळ विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व सुधारण्याचा नाही, तर त्यांची शालेय कामगिरी देखील सुधारण्याचा आहे.चोपडे यांना विश्वास आहे की, जिल्हाधिकारी यांची परवानगी मिळाल्यास जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा घेता येईल. त्यांचे शिक्षण आणि काम हा त्यांचा छंद आहे आणि ते त्याला पूर्णतः समर्पित आहेत.

## माझं मत : ठाकरे बंधूंनी युती करावी का?

**मनीषा मिरजकर(मन सैनिक)**

होय. मनसे प्रमुख राज साहेब ठाकरे आणि शिवसेना पक्षाचे सर्वेसर्वा उध्दव साहेब ठाकरे यांनी परिस्थिती नुरुप एकत्र येणं ही तमाम मराठी जणांची इच्छा आणि मनीषा देखील आहे.या दोन्ही बंधूंच्या आपसातील वितुष्टमुळे मागील अनेक वर्ष भाजप सारख्या संधीसाधू पक्षाने आपला फायदा करून घेतलेला आहे.मात्र यामुळे महाराष्ट्रातील अस्सल मराठी माणूस मात्र हतबल झालेला आहे.तो विभागला गेल्यानेच मराठी मतांमध्ये फूट पडली आणि चुकीचे लोक आज सत्ताधारी म्हणून मिरवीत आहेत. म्हणूनच मराठी माणसाच्या भल्यासाठी या दोन्ही बंधूंची कायम युती व्हावी हीच मनीषा आहे.

**संतोष साठे ( शिवसैनिक)**

दोघांचे भांडण तिसऱ्याच लाभ ही मराठीतील म्हण अगदी सुपरिचित आहे.ठाकरे बंधूंचे देखील मागील काही वर्षांपासून असेच झाले आहे.ज्याचा फायदा इतर विशेषत भाजप सारख्या उपर्या पक्षाने घेतला आहे.यामुळे.मराठी माणसाची मात्र गोची झालेली आहे. जर ठाकरे बंधू निवडणुकांच्या निमित्ताने का होईना एकत्र आले तर नक्कीच पुन्हा एका शिवसेनेची सत्ता प्रस्थापित होईल आणि मराठी माणसाचा आवाज अबाधित राहील यात शंकाच नाही.

## चलती का नाम गाडी : XC60 ही आतापर्यंतची सर्वाधिक विक्री होणारी व्होल्वो कार

व्होल्वोच्या २७ लाखांहून अधिक कार विकल्या गेल्या आहेत, त्यामुळे व्होल्वो XC60 ने आयकॉनिक व्होल्वो २४० ला मागे टाकत आतापर्यंतची सर्वाधिक विक्री होणारी व्होल्वो मॉडेल बनली आहे. २००८ मध्ये पदार्पण झाल्यापासून, व्होल्वो कार्सची मध्यम आकाराची एसयूव्ही ग्राहकांमध्ये आवडती राहिली आहे, जी सुरक्षितता, गुणवत्ता आणि प्रीमियम ड्रायव्हिंग



अनुभवाला महत्त्व देणाऱ्या विविध ड्रायव्हर्सना आकर्षित करते. २०१८ मध्ये, तिला वर्ल्ड कार ऑफ द इयर म्हणून घोषित करण्यात आले."१९८० च्या दशकात स्वीडनमध्ये वाढताना, व्होल्वो २४० ही आयकॉनिक फॅमिली कार होती तुम्हाला जवळजवळ प्रत्येक ड्राईव्हवेमध्ये एक कार दिसू शकते,'' व्होल्वो कार्सच्या ग्लोबल ऑफरच्या प्रमुख सुसान हॅग्लंड म्हणतात. "आज XC60 ने दोन प्रकारे हे स्थान मिळवले आहे. केवळ कुटुंबाची आवडतीच नाही तर आमची सर्वकालीन टॉप-सेलर देखील बनली आहे, जी यशस्वी कारचा अंतिम पुरावा आहे."-

**संकलन –संयोजन : सुबोध रणशेवरे**

# दैनिक अतुल्य महाराष्ट्र

बीड, बुधवार, 2 जुलै 2025









# आ. कराड यांच्या प्रयत्नातून लातूर - कळंब रस्ता डांबरीकरणासह सुरळीत; नागरिकाकडून समाधान

**लातूर | प्रतिनिधी**

लातूर येथील जुन्या एमआयडीसी परिसरातील गायब झालेल्या लातूर ते कळंब हा राज्यमार्ग रस्ता लातूर ग्रामीणचे आ. श्री रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नामुळे खुला झाला असून या रस्त्याचे हॉटमिक्स डांबरीकरण होऊन वाहनधारकांना प्रवासासाठी सुरू झाल्याने कळंब रस्त्यावरील अनेक गावच्या नागरिकांनी समाधान व्यक्त करून आ. कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

पूर्वीच्या काळात लातूर येथील जुन्या एमआयडीसी परिसरातून जाणारा लातूर ते कळंब २३६ हा राज्यमार्ग एमआयडीसी सुरू होण्यापूर्वी होता एमआयडीसी अस्तित्वात आल्यानंतर उद्योजकांना जागेचे वाटप झाल्यानंतर सदरचा अस्तित्वात असलेला रस्ता गायब झाल्याने वाहनधारकांना एमआयडीसीतील विविध पर्यायी रस्त्याचा आधार घेऊन प्रवास करावा लागत असे.

कळंब रस्त्यावरील दूरवरचा प्रवास करणाऱ्यासह लातूर तालुक्यामधील विविध गावच्या नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन लातूर ग्रामीणचे आ. श्री रमेशआप्पा कराड यांनी एमआयडीसी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन लोप पावलेला रस्ता खुला करून घेण्याच्या आणि रस्त्याचे काम करण्याच्या सूचना केल्या होत्या. आ. कराड यांच्या सूचनेनुसार एमआयडीसी यांच्याकडून नाहरकत घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी पीव्हीआर चौक ते टिना ऑइल मिल चौक आणि पुढे कीर्ती ऑइल मिल चौक दरम्यानच्या रस्त्याची सरळ जोडणी करून या रस्त्याचे हॉट मिक्स डांबरीकरण केले.

भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर - कळंब रस्त्यावर लातूर शहरानजीक असलेल्या रेल्वे क्रॉसिंगवर सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून मोठा पूल मंजूर करून त्यासाठी निधीही उपलब्ध करून घेतला आहे सदर पुलाची टेंडर प्रक्रिया सुरू आहे.

आमदार झाल्यानंतर वाहनधारकासह सर्वसामान्याची अडचण लक्षात घेऊन भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर कळंब राज्य रस्त्याचा प्रश्न मार्गी लावून रस्त्यावरील विविध गावच्या वाहनधारकांना दळणवळणाची सोय सुरळीत करून दिल्याने समाधान व्यक्त करून आ. रमेशआप्पा कराड यांचे अनेकांनी आभार व्यक्त केले आहेत.

# साहेब..."आपला कारभार असा कसा ऑफिसला आठवड्यातून एक दोन दिवस तरी बसा !"

## परळीकर भूमी अभिलेख उप अधीक्षकांच्या मनमानी कारभाराला कंटाळले

## संबंधित मंत्र्यांकडे करणार तक्रार - सामाजिक कार्यकर्ते

**परळी / प्रतिनिधी**

परळीतील भूमी अभिलेख कार्यालयात कार्यरत उप अधीक्षक यांचा अनियमित व मनमानी कारभार सध्या प्रचंड वादात आहे. "इतरत्र ठिकाणांहून ऑफिस चालवणारे साहेब" अशी उपहासात्मक चर्चा सध्या परळी तालुक्यात सुरू आहे. त्यांच्या उपस्थितीअभावी शेतकऱ्यांची, नागरिकांची व कार्यालयातील कर्मचाऱ्यांची प्रचंड गैरसोय होत असून, अनेकांच्या तक्रारी आता थेट वरिष्ठ पातळीवर पोहोचल्या आहेत.

परळी तहसील कार्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावर वसलेले भूमी अभिलेख कार्यालय हे जमीन मोजणी, नोंदणी, खरेदी-विक्री व्यवहारांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठिकाण आहे. दिवसेंदिवस नागरिकांची वर्दळ वाढत असूनही उप अधीक्षक आठवड्यातून केवळ एकदाच कार्यालयात हजेरी लावतात अशीही चर्चा आहे,




उर्वरित दिवस 'वर्क फ्रॉम इतरत्र'च्या नावाखाली कामकाज चालवले जाते.

अनेक नागरिकांच्या नावनोंदणीच्या फाईली जाणीवपूर्वक रिजेक्ट केल्या जातात, आणि नंतर "समजुतीतून" त्याचे निवारण केले जाते — असा आर्थिक लाभाचा थेट आरोप नागरिक करत आहेत. एवढंच नव्हे, तर अनेक ठिकाणच्या रस्त्याचं कामही त्यांच्या हलगर्जीमुळे रखडल्याची जोरदार चर्चा आहे. नेमके सत्य चौकशीतून समोर येईलच.

या प्रकारामुळे सामान्य नागरिकांचा संयम सुटू लागला आहे. भूमी अभिलेख कार्यालय हे शेतकऱ्यांसाठी आयुष्यभराच्या जमिनीच्या व्यवहारांचं केंद्र असतं. तेथील अधिकारीच गैरहजर, मनमानी व भ्रष्ट वागणूक देत असतील, तर सामान्य माणसाने न्याय कुठे शोधायचा? असा सवाल विचारला जात आहे.

अनेक नागरिकांनी माझ्याकडे वैयक्तिक भेटून आणि कॉल करून याबाबत तक्रार केली आहे आणि या सर्व अनुषंगाने मी लवकरच वरिष्ठांना आणि संबंधित खात्याच्या मंत्र्यांना पत्र पाठवून याबाबत कारवाई करण्याची विनंती करणार आहे

**– रानबा गायकवाड (ज्येष्ठ पत्रकार,संपादक व साहित्यिक)**

# संजय गांधी, श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना मानधन तात्काळ वाटप करावे

## माजी आ. भीमराव धोंडे यांची जिल्हाधिकारी यांचेकडे मागणी

**आष्टी प्रतिनिधी**

आष्टी विधानसभा मतदार संघातील आष्टी,पाटोदा, शिरूर (कासार) तालुक्यातील

१५ हजार ८२० लाभार्थ्यांना संजय गांधी स्वावलंबन योजना आणि श्रावणबाळ निराधार योजनेअंतर्गत गेल्या सहा महिन्यांपासून मानधन मिळत नाही.या वयोवृद्ध, विधवा आणि अपंग नागरिकांना उपजीविकेचे दुसरे साधन नाही.त्यामुळे त्यांना शासकीय मानधन मिळणे अत्यंत आवश्यक आहे.आष्टी तालुक्यातील ९ हजार १७०, पाटोदा तालुक्यातील २ हजार ४२९ आणि शिरूर (कासार) तालुक्यातील ४ हजार २२९ लाभार्थ्यांचे मानधनाचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. यासर्व लाभार्थ्यांनी डीबीटी पोर्टलवर नोंदणी करूनदेखील त्यांना मानधन मिळत नाही. त्यामुळे यांची उपासमार होत आहे.



जिल्हाधिकारी बीड यांनी याबाबत आष्टी,पाटोदा आणि शिरूर (कासार) तहसीलदार यांनी याबाबत तात्काळ कार्यवाही करून मानधन वाटप करावे असे आदेश देण्यात यावेत असे निवेदन निवेदन माजी आ. भीमराव धोंडे यांनी कृषिदिन दि.१ जुलै रोजी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना दिले आहे.

जिल्हाधिकारी यांनी देखील तातडीने याबाबत कार्यवाही होईल असे आश्वासन दिले आहे.यावेळी उपसभापती पांडुरंग नागरगोजे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, माजी उपसभापती देवीदास शेंडगे, माजी सभापती अनिल जायभाये, माजी सरपंच प्रफुल्ल सानप,उत्तम बोडखे,भागवत वारे उपस्थित होते.

# औष्णिक विद्युत केंद्रात वसंतराव नाईक यांची जयंती साजरी

**परळी /प्रतिनिधी**

औष्णिक विद्युत केंद्रात दि १ जुलै रोजी हरित क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यकारी अभियंता कुंदन राठोड हे होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कामगार नेते सोपान चौधर यांनी वसंतराव नाईक यांच्या जीवन कार्यावर मार्गदर्शन केले. समारोप करताना कुंदन राठोड म्हणाले की, नाईक साहेबांच्या कार्यकाळात कृषी धोरण प्रभावीपणे राबविण्यात आले



होते. यावेळी महानिर्मितीचे सुरक्षा अधिकारी वरिष्ठ व्यवस्थापक बी आर अंबड ,जायभाये, सोपान चौधर, बालाजी पवार, विनोद राठोड, आदिची उपस्थिति होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू गजले यानी केले तर उपस्थितांचे आभार सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड यानी मानले



# कृषी दिनानिमित्त कृषी विभाग अंबाजोगाई मार्फत शेतकऱ्याचा सत्कार; आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना मिनी किट वाटप

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व पंचायत समिती अंबाजोगाई,यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक.०१.०७.२०२५ रोजी कै.वसंतराव नाईक (माजी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य ) यांच्या 112 व्या जयंतीनिमित्त पंचायत समिती सभागृह अंबाजोगाई येथे कृषी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमास अधक्ष्या श्रीमती. समृध्दी दिवाने (गटविकास अधिकारी ,अंबाजोगाई) , प्रमुख मार्गदर्शक श्री.अरुण गुट्टे (कृषी विद्यावेत्ता व.ना.म.कृ. वि परभणी), प्रमुख उपस्थिती श्री. राहुल गायकवाड (उपविभागीय कृषी अधिकारी, अंबाजोगाई ),श्री शरद जोगदंड (पोलीस उपनिरीक्षक,अंबाजोगाई ), श्री. रवी मुंडे (तालुका कृषी अधिकारी, अंबाजोगाई) व्यंकटेश जोशी ( बार्टी, समतादूत सामजिक न्याय विभाग) सदर मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांनी कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला



अभिवादन करून उपस्थित शेतकऱ्यांना विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान अंबाजोगाई तालुक्यातील खरीप व रब्बी पिक स्पर्धेतील विजेत्या शेतकऱ्यांचा व शेतीतील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्यांचा गौरव व सत्कार करण्यात आला. तदनंतर सदर प्रगतशील शेतकऱ्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना आपल्या शेतीतील अनुभव सांगत मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना कृषी विभागातर्फे मिनी किटचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी पंचायत समिती आवारात वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# सामान्य आवाज समितीत पोहोचला!

## ॲड. माधव जाधव यांची जिल्हा DISHA समितीच्या अशासकीय सदस्यपदी निवड

**अंबाजोगाईत / प्रतिनिधी**

बीड चे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी ॲड. माधव जाधव यांची जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (DISHA) च्या अशासकीय सदस्यपदी निवड केली आहे. ही निवड म्हणजे फक्त एका कार्यकर्त्याचा सन्मान नसून, तळागाळातील लोकांच्या प्रश्नांना अधिक प्रभावी आणि थेट सरकारी व्यवस्थेत आवाज मिळवून देणारी कृती आहे.

**विश्वासाची थेट पावती!**

सामान्य कुटुंबातून येणारे आणि सामाजिक कामात सातत्याने सक्रिय असणारे ॲड. माधव जाधव यांनी या निवडीबद्दल प्रतिक्रिया देताना सांगितले –

ही जबाबदारी माझ्यासाठी केवळ सन्मान नसून, तितकीच मोठी जवाबदारी आहे. मी या मंचाचा वापर शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्यांचे प्रश्न प्रशासनापर्यंत जिद्दीने पोहोचवण्यासाठी करणार आहे. बप्पासाहेबांनी जो विश्वास दाखवला आहे, तो कधीच फोल ठरणार नाही."



**DISHA समिती म्हणजे काय?**

केंद्र सरकारच्या विविध योजना, पायाभूत सुविधा प्रकल्प, कृषी, आरोग्य, शिक्षण, वसाहत आणि सार्वजनिक सेवांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर कार्यरत असणारी DISHA (District Development Coordination and Monitoring Committee) ही अत्यंत महत्त्वाची समिती आहे. या समितीत अशासकीय सदस्यांची भूमिका जनतेच्या समस्यांचा थेट आवाज बनणं ही असते.

# सामाजिक कार्यकर्ते सय्यद ऊमेर यांच्या तर्फे राष्ट्रीय टपाल कर्मचारतरी दिनी टपाल कर्माचार्यांचा सत्कार



राष्ट्रीय टपाल कर्मचारी दिवस – १ जुलै "जे आप्तस्वकीयांचे संदेश घेऊन येतात तेच खरे देशसेवक असतात! राष्ट्रीय टपाल कर्मचारी दिवसाच्या निमित्ताने टपाल कर्मचारी नितीन भैय्या यांना पोस्ट ऑफिसमध्ये भेट देऊन शुभेच्छा दिल्या. याच वेळी तिथे उपस्थित मौरे साहेब,टपालमास्तर पाठक साहेब यांनाही शुभेच्छा देण्यात आल्या.सय्यद अब्बास, शेख अहमद, शेख युनुस, व सय्यद हसन, एजाज खान यांची उपस्थिती होती